दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | सोमवार , 12 ऑक्टोबर 2026 | अंक क्र. 149 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

आपल्याकडे काही न्युज सबंधित महत्वाचे व्हीडिओ असतील तर खालील नंबर पाठवा.
मो. 8421577797
आपले नाव गुपीत ठेवण्यात येईल

# माहूर नवरात्रोत्सवासाठी प्रशासन सज्ज : जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

■ नांदेड प्रतिनिधी

माहूरगडावरील शारदीय नवरात्रोत्सव-२०२६ दरम्यान येणाऱ्या भाविकांना सुरक्षित, सुलभ व सुरळीत दर्शन मिळावे,यासाठी आरोग्य,सुरक्षा,वाहतूक, स्वच्छता,पाणी व वीज यांसह सर्व आवश्यक सुविधांमध्ये कोणतीही कुचराई होणार नाही, याची दक्षता घ्यावी,असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांना दिले.

माहूर येथे दि.११ ते २० ऑक्टोबर या कालावधीत होणाऱ्या शारदीय नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली यात्रा नियोजनाबाबत आढावा बैठक घेण्यात आली.सहधर्मादाय आयुक्त तथा संस्थानच्या पदसिद्ध अध्यक्षा हिराबाई शेळके आणि पोलीस अधीक्षक डॉ.निलाभ रोहन यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या बैठकीत विविध विभागांच्या तयारीचा सविस्तर आढावा घेण्यात आला.यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी तथा संस्थानचे उपाध्यक्ष किरणकुमार भोंडवे, सहाय्यक जिल्हाधिकारी तथा सचिव बी. सरवणन,तहसीलदार तथा कोषाध्यक्ष अभिजीत जगताप,विश्वस्त तथा पुजारी चंद्रकांत भोपी,संजय कान्नव,सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभागाचे अधिकारी,आगार प्रमुख चंद्रशेखर समर्थवाड, वन परिक्षेत्र अधिकारी रोहित जाधव,ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक,गटविकास अधिकारी ज्ञानेश्वर टाकरस,नगरपंचायतीचे मुख्याधिकारी,महावितरणचे कार्यकारी अभियंता,पुरातत्त्व विभागाचे अधिकारी,अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी तसेच संबंधित विभागांचे प्रमुख व प्रतिनिधी उपस्थित होते.

## भाविकांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य; पाच शे हून अधिक पोलीस अधिकारी,कर्मचारी

## 120 एसटी बसेस सज्ज,दोन हजारांहून अधिक अधिकारी-कर्मचारी तैनात





माहूरगडावर भाविकांच्या वाहतुकीसाठी राज्य परिवहन महामंडळाच्या १२० बसेस उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती आगार प्रमुख चंद्रशेखर समर्थवाड यांनी दिली. भाविकांच्या सुरक्षेसाठी ५ शे हून अधिक पोलीस अधिकारी, कर्मचारी व होमगार्ड तैनात करण्यात येणार असून,गर्दी नियंत्रण,दर्शन रांगा आणि वाहतूक व्यवस्थेवर विशेष लक्ष देण्यात येणार आहे.

भाविकांना वन्यप्राण्यांपासून सुरक्षितता मिळावी यासाठी जंगल परिसरात वन कर्मचाऱ्यांची गस्त वाढविण्यात येणार असून, आवश्यक ठिकाणी सुरक्षा पथके नियुक्त करण्यात येणार आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून रस्ते दुरुस्तीची कामे, तर राष्ट्रीय महामार्ग विभागाकडून बंद असलेले पथदिवे नवरात्रोत्सवापूर्वी सुरू करण्यात येणार आहेत. भाविकांच्या आरोग्य सुविधांसाठी ग्रामीण रुग्णालयातील ४० पैकी २० खाटा यात्रा व्यवस्थापनासाठी राखीव ठेवण्यात येणार आहेत. पुरेसा औषधसाठा आणि रुग्णवाहिका उपलब्ध ठेवण्यात येणार असून,दत्तशिखर, अनुसया माता व रेणुकामाता मंदिराच्या पायथ्याशी आरोग्य पथके आणि रुग्णवाहिका तैनात करण्यात येणार आहेत.

पंचायत समितीच्या माध्यमातून भाविकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवण्यात येणार आहे. संस्थानतर्फे पिण्याचे पाणी, स्वच्छता, वीज, सुलभ दर्शन रांगा तसेच परशुराम मंदिर परिसरात महाप्रसाद,साबुदाणा खिचडी व फळांची व्यवस्था करण्यात येणार आहे. नगरपंचायतीतर्फे दत्त चौक येथील नियंत्रण कक्ष, पाणी, पथदिवे आणि शौचालयांची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. दत्तशिखर संस्थानतर्फे पाणी, स्वच्छता, वीज, महाप्रसाद तसेच संस्थानच्या जागेत मोफत वाहनतळाची सुविधा उपलब्ध राहणार आहे. महावितरणकडून अखंडित वीजपुरवठा करण्याची ग्वाही देण्यात आली.

नवरात्रोत्सवाच्या कालावधीत भाविकांच्या आरोग्य, सुरक्षा, वाहतूक व इतर आवश्यक सुविधांसाठी विविध विभागांचे दोन हजारांहून अधिक अधिकारी-कर्मचारी कार्यरत राहणार आहेत. दरम्यान, पुरातत्त्व विभाग आणि अन्न व औषध प्रशासनाच्या प्रमुखांच्या बैठकीतील अनुपस्थितीची जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी गांभीर्याने नोंद घेतली. शारदीय नवरात्रोत्सवासाठी प्रशासन, पोलीस यंत्रणा आणि संस्थान सज्ज झाले असून, भाविकांना सुरक्षित व सुरळीत दर्शनाचा अनुभव मिळावा यासाठी सर्व यंत्रणा समन्वयाने कार्यरत राहणार आहेत. भाविकांनी प्रशासनाने केलेल्या सूचनांचे व शिस्तीचे पालन करून निर्धास्तपणे माहूरगडावर यावे आणि श्री रेणुकामातेचे दर्शन घ्यावे, असे आवाहन प्रशासन व संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.





## सुशील घोटे पाटील यांना प्रचंड बहुमताने विजयी करा : अनुप कुसुमकर

### पक्ष नको...संघटना हवी यावर पदवीधर ठाम

■ परळी / प्रतिनिधी

"पक्ष नको....संघटना हवी" प्रश्न पदवीधरांचा आवाज संघटनेचा या घोषवाक्यासह मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे मराठवाडा शिक्षक संघटनेचे अधिकृत उमेदवार सुशील घोटे पाटील यांना प्रचंड बहुमताने विजयी करण्याचे आवाहन मराठवाडा शिक्षक संघटनेचे तालुका अध्यक्ष अनुप कुसुमकर यांनी केले आहे.सुशील घोटे पाटील यांना शिक्षक संघटनेने अधिकृत उमेदवारी दिली असून, पदवीधरांचे प्रश्न सोडविण्यासाठी आणि युवकांच्या अपेक्षांना न्याय देण्यासाठी त्यांना पाठबळ देण्याचे आवाहन कुसुमकर यांनी केले.

पदवीधरांच्या विविध समस्या, युवकांसाठी रोजगाराच्या संधी, शैक्षणिक विकास तसेच मराठवाड्याच्या सर्वांगीण प्रगतीसंदर्भात सकारात्मक विचारविनिमय करून पदवीधरांच्या प्रश्नांची जाण असणारे आणि युवकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील राहणारे नेतृत्व विधान परिषदेत पाठविणे गरजेचे असल्याचे मत अनुप कुसुमकर यांनी व्यक्त केले. पदवीधरांचे प्रश्न, युवकांचे भविष्य आणि मराठवाड्याचा विकास या मुद्द्यांना प्राधान्य देत सर्व पदवीधर मतदारांनी सुशील घोटे पाटील यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहावे आणि त्यांना जास्तीत जास्त मतांनी विजयी करावे, असे आवाहन शिक्षक संघटनेकडून करण्यात आले आहे.

## घामाच्या धारा आणि उकाड्याने महाराष्ट्र तापला,उष्णतेमुळे नागरिक हैराण!

■ मुंबई वृत्तसंस्था

महाराष्ट्रात ऑक्टोबर महिन्यातील उन्हाचा तडाखा दिवसेंदिवस वाढत असून नागरिकांना उकाड्याचा सामना करावा लागत आहे. सकाळपासूनच उन्हाची तीव्रता जाणवत असून दुपारच्या वेळी तापमानात वाढ होत आहे. भारतीय हवामानशास्त्र विभागाच्या अंदाजानुसार, 12 ऑक्टोबर रोजी राज्यातील बहुतांश भागांत हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे. राज्यासाठी कोणताही विशेष हवामान अलर्ट जारी करण्यात आलेला नसला, तरी वाढत्या तापमानामुळे नागरिकांना उन्हाचा त्रास होऊ शकतो.

कोकण विभागात मागील दिवशी उष्णतेचा यलो अलर्ट होता. मात्र, 12 ऑक्टोबर रोजी या भागासाठी कोणताही विशेष अलर्ट नसल्याचा अंदाज आहे. येथे कमाल तापमान 36 अंश, तर किमान तापमान 23 अंश सेल्सिअसच्या आसपास राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे उकाडा आणि उन्हाचा त्रास जाणवू शकतो.

उत्तर महाराष्ट्रातील धुळे, नंदुरबार, जळगाव आणि नाशिक जिल्ह्यांत हवामान कोरडे राहण्याचा अंदाज आहे. या भागात कमाल तापमान 33 ते 34 अंश सेल्सिअसच्या आसपास राहू शकते. पश्चिम महाराष्ट्रातही उष्ण आणि कोरडे हवामान कायम राहण्याची शक्यता असून कमाल तापमान 32 अंश, तर किमान तापमान 21 अंश सेल्सिअसच्या आसपास राहण्याचा अंदाज आहे. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, हिंगोली, नांदेड, लातूर आणि धाराशिव या जिल्ह्यांत पावसाची शक्यता कमी असून हवामान कोरडे राहू शकते. या भागात कमाल तापमान 35 ते 37 अंश, तर किमान तापमान 20 ते 24 अंश सेल्सिअसच्या दरम्यान राहण्याचा अंदाज आहे. काही भागांत पाणीटंचाईची समस्याही कायम आहे. विदर्भातही ऑक्टोबर हिटचा प्रभाव जाणवत आहे. पुढील 4 ते 5 दिवस या भागात उष्ण आणि कोरडे हवामान राहण्याची शक्यता आहे.

# शनि अमावस्येनिमित्त मच्छिंद्रनाथ गडावर नाथभक्तांचा महापूर..

## 'अलख निरंजन'च्या जयघोषाने मायंबा नगरी दुमदुमली!

■ आष्टी: प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील सावरगाव (मायंबा) येथील गर्भगिरीच्या निसर्गरम्य पर्वत रांगेत विसावलेल्या श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गडावर शनि अमावस्येनिमित्त भाविकांची अभूतपूर्व मांदियाळी पाहायला मिळाली. जगातील एकमेव संजीवन समाधी असलेल्या या पवित्र स्थळी दर्शनासाठी महाराष्ट्रासह परराज्यातून लाखो नाथभक्तांनी हजेरी लावली होती. शनिवारी पहाटेपासूनच सुरू झालेल्या भक्तांच्या गर्दीने संपूर्ण गड परिसर गजबजून गेला होता.

शनि अमावस्येचे विशेष महत्त्व असल्याने गडावर शुक्रवारी रात्रीपासूनच भाविक दाखल होण्यास सुरुवात झाली होती. शनिवारी पहाटे महापूजा आणि आरती झाल्यानंतर 'अलख निरंजन', बडे बाबा की जय' अशा जयघोषाने संपूर्ण मायंबा नगरी दुमदुमून गेली होती. नवनाथ संप्रदायाचे आद्यगुरू मच्छिंद्रनाथ यांच्या संजीवन समाधीचे दर्शन घेऊन धन्य झाल्याची भावना अनेक भाविकांनी व्यक्त केली. दर अमावस्येला येथे हजारो भाविक येतात, मात्र शनि अमावस्येचे औचित्य असल्याने ही गर्दी लाखांच्या घरात पोहोचली होती. भाविकांना सुलभ दर्शन व्हावे यासाठी देवस्थान ट्रस्ट ,स्वयंसेवक आणि पोलीस प्रशासनाच्या वतीने चोख नियोजन करण्यात आले होते. पिण्याचे पाणी, सावलीसाठी मंडप, आणि आपत्कालीन वैद्यकीय सेवांची चोख व्यवस्था करण्यात आली होती. तसेच, कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी चोख पोलीस बंदोबस्तही तैनात करण्यात आला होता.

मच्छिंद्रनाथ गडाचा कायापालट करण्यासाठी आणि येथे येणाऱ्या देशभरातील भाविकांना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आमदार सुरेश धस यांच्या मार्गदर्शनाखाली मंदिर परिसरात विविध भव्य विकासकामे वेगाने सुरू आहेत. भक्तनिवास, सुसज्ज रस्ते, घाट आणि परिसर सुशोभीकरणाच्या कामांमुळे गडाचे वैभव अधिकच वाढणार असून, या नियोबद्ध विकासकामांबद्दल भाविकांनी समाधान व्यक्त केले. दिवसभर चाललेल्या या धार्मिक उत्सवात महाप्रसादाचेही वाटप करण्यात आले. भक्ती आणि उत्साहाच्या वातावरणात हा शनि अमावस्या सोहळा अत्यंत शांततेत व उत्साहात पार पडला.



# मुलींच्या स्वप्नांना मिळू द्या समानतेचे आकाश : सुजाता मोरे

**प्रत्येक मुलीच्या डोळ्यांत स्वतःचे आयुष्य घडविण्याचे, शिक्षण घेण्याचे, स्वावलंबी होण्याचे आणि समाजात सन्मानाने जगण्याचे स्वप्न असते. कोणाला डॉक्टर, शिक्षिका, प्राध्यापिका, अधिकारी, संशोधक, मार्गदर्शक किंवा उद्योजिका व्हायचे असते, तर कोणाला आपल्या कर्तृत्वातून समाजपरिवर्तन घडवायचे असते. या स्वप्नांना आकार देण्यासाठी शिक्षणाबरोबरच सुरक्षितता, समान संधी आणि आत्मसन्मान आवश्यक असतो. आज मुलींनी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय प्रगती केली असली, तरी त्यांच्या वाट्याला भेदभाव, अपमान आणि दुय्यम वागणूक येत असल्याचे वास्तव नाकारता येत नाही. मुलींच्या संरक्षणासाठी कायदे अस्तित्वात असतानाही कामाच्या ठिकाणी त्यांच्या क्षमतेवर शंका घेणे, कामाचे श्रेय नाकारणे, प्रगतीच्या संधींपासून दूर ठेवणे आणि अपमानास्पद टिप्पणी करणे असे प्रकार घडतात. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बालिका दिन हा केवळ मुलींच्या यशाचा गौरव करण्याचा दिवस नसून त्यांच्या हक्कांचा, सुरक्षिततेचा आणि सन्मानाने जगण्याच्या अधिकाराचा विचार करण्याची संधी आहे.**





संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने २०११ मध्ये ११ ऑक्टोबर हा आंतरराष्ट्रीय बालिका दिन म्हणून घोषित केला. मुलींचे हक्क, त्यांच्यासमोरील आव्हाने आणि त्यांना उपलब्ध करून द्यावयाच्या संधी यांविषयी जागरूकता निर्माण करणे हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे. मुलींचे शिक्षण, आरोग्य, पोषण, सुरक्षितता, बालविवाहाचे निर्मूलन आणि निर्णयप्रक्रियेतील सहभाग यांना या दिनानिमित्त महत्त्व दिले जाते. मात्र, बालिकेच्या हक्कांचा विचार केवळ तिच्या बालपणापुरता मर्यादित ठेवता येत नाही. बालपणी कुटुंबात मिळणारी वागणूक, शिक्षणाविषयीची भूमिका आणि स्वातंत्र्याबाबतचे सामाजिक संकेत यांचा परिणाम तिच्या पुढील आयुष्यावर होतो. म्हणून मुलीला सुरक्षित बालपण देण्याबरोबरच प्रौढ झाल्यावर शिक्षण, रोजगार आणि सार्वजनिक जीवनात सन्मानाने सहभागी होण्याची संधी देणेही आवश्यक आहे.

भारतीय समाजात मुलींनी शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान, प्रशासन, क्रीडा, उद्योग, पर्यटन आणि सामाजिक कार्य अशा विविध क्षेत्रांत आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. ग्रामीण भागातील अनेक मुली प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण पूर्ण करतात, घरातील जबाबदाऱ्या सांभाळतात आणि आर्थिक स्वावलंबन मिळविण्यासाठी प्रयत्न करतात. तरीही मुलगा आणि मुलगी यांच्यातील भेदभाव अनेक कुटुंबांत आणि सामाजिक संस्थांमध्ये टिकून आहे. मुलाच्या महत्त्वाकांक्षेला प्रोत्साहन दिले जाते, तर मुलीच्या आकांक्षांना सुरक्षिततेच्या किंवा कौटुंबिक प्रतिष्ठेच्या नावाखाली मर्यादा घातल्या जातात. मुलीने कोणते शिक्षण घ्यावे, कुठे नोकरी करावी आणि किती स्वतंत्रपणे निर्णय घ्यावेत, यावर अनावश्यक बंधने लादली जातात. समानतेचा अर्थ मुलींना केवळ शिक्षणाची परवानगी देणे नव्हे, तर त्यांना स्वतःचे निर्णय घेण्याचा अधिकार आणि त्या निर्णयांचा आदर मिळवून देणे हा आहे.

कामाच्या ठिकाणी प्रवेश केल्यानंतर भेदभाव अधिक सूक्ष्म स्वरूपात दिसून येऊ शकतो. एखाद्या तरुणीने चांगले शिक्षण घेतले, आवश्यक कौशल्ये आत्मसात केली किंवा स्पर्धा परीक्षेत यश मिळविले, तरी तिच्या कामाचे मूल्यमापन गुणवत्तेऐवजी लिंगाच्या आधारावर होऊ शकते. बैठकीत तिने मांडलेल्या सूचनेकडे दुर्लक्ष करणे, तिचे म्हणणे मध्येच तोडणे, तिच्या कल्पनेचे श्रेय दुसऱ्याला देणे किंवा महत्त्वाच्या जबाबदाऱ्यांपासून दूर ठेवणे, ही भेदभावाची उदाहरणे आहेत. काही ठिकाणी महिलांना नेतृत्वासाठी योग्य समजले जात नाही. विवाह किंवा मातृत्वामुळे त्यांची कार्यक्षमता कमी होईल, असे कोणताही ठोस आधार नसताना गृहीत धरले जाते. समान पात्रता आणि कामगिरी असूनही वेतन, बढती, प्रशिक्षण आणि निर्णयप्रक्रियेतील सहभागाच्या संधींमध्ये तफावत दिसू शकते. या वर्तनामुळे महिलांच्या कष्टांचे अवमूल्यन होते आणि त्यांच्या प्रगतीच्या मार्गात अडथळे निर्माण होतात.

अपमानास्पद आणि हीन वागणूक हीदेखील भेदभावाची गंभीर बाजू आहे. सहकाऱ्यांसमोर एखाद्या मुलीला कमी लेखणे, तिच्या दिसण्यावर टिप्पणी करणे, तिच्या बुद्धिमत्तेची खिल्ली उडवणे, तिच्या मताला भावनिक ठरवून नाकारणे किंवा तिच्या यशामागे दुसऱ्याच व्यक्तीचा हात असल्याचे सांगणे, यामुळे तिच्या आत्मसन्मानाला धक्का पोहोचतो. काही वेळा अशा वर्तनाला विनोदाचे स्वरूप दिले जाते. परंतु विनोदाच्या नावाखाली वारंवार होणारा अपमान संबंधित व्यक्तीच्या मनावर खोल परिणाम करू शकतो. सतत अशा अनुभवांना सामोरे जावे लागल्यास ती स्वतःचे मत मांडण्यास कचरू शकते, नवीन जबाबदारी स्वीकारण्यास घाबरू शकते किंवा नोकरी सोडण्याचा निर्णय घेऊ शकते. त्यामुळे कामाच्या ठिकाणी होणारा भेदभाव हा केवळ वैयक्तिक संवेदनशीलतेचा प्रश्न नसून मानवी प्रतिष्ठा, समान हक्क आणि संस्थात्मक न्यायाशी संबंधित आहे.

मुलींच्या सुरक्षेसाठी कायदे असणे ही महत्त्वाची बाब आहे; परंतु कायद्याची तरतूद आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी यांमध्ये अंतर राहिले, तर संरक्षणाचा उद्देश पूर्ण होत नाही. भारतीय संविधानातील समानतेचा अधिकार आणि लिंगाच्या आधारावर भेदभावास मनाई करणाऱ्या तरतुदी महिलांच्या हक्कांसाठी महत्त्वाच्या आहेत. कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ रोखण्यासाठी आणि त्यासंबंधी तक्रारींचे निवारण करण्यासाठी 'कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम, २०१३' अस्तित्वात आहे. या कायद्याचा उद्देश महिलांसाठी सुरक्षित कार्यपरिसर निर्माण करणे हा आहे. कायद्यानुसार दहा किंवा त्यापेक्षा अधिक कर्मचारी असलेल्या पात्र संस्थांमध्ये अंतर्गत समिती स्थापन करण्याची तरतूद आहे. संबंधित अटींनुसार इतर प्रकरणांत जिल्हास्तरीय स्थानिक समितीमार्फत तक्रार निवारणाची व्यवस्था उपलब्ध असते. या व्यवस्थेची माहिती कर्मचाऱ्यांना देणे आणि तक्रारींची योग्य दखल घेणे महत्त्वाचे आहे.

तथापि, प्रत्येक अपमानास्पद किंवा भेदभावपूर्ण वर्तन आपोआप लैंगिक छळाच्या कायदेशीर व्याख्येत येते असे नाही. घटनेचे स्वरूप, उपलब्ध पुरावे आणि लागू कायद्यातील अटी यांनुसार तिचे मूल्यमापन करावे लागते. तरीही एखादे वर्तन विशिष्ट कायद्याच्या कक्षेत बसत नाही म्हणून त्याकडे दुर्लक्ष करणे योग्य नाही. लिंगाधारित पूर्वग्रह, अन्यायकारक मूल्यमापन, अपमानकारक भाषा आणि संधी नाकारणे यांसारख्या बाबींवर संस्थांनी त्यांच्या अंतर्गत नियमांनुसार योग्य उपाययोजना करणे आवश्यक आहे. कायद्याचे पालन करणे ही किमान जबाबदारी आहे; प्रत्येक कर्मचाऱ्याला सन्मानाने वागविणे ही नैतिक आणि संस्थात्मक जबाबदारी आहे.

कायद्यांची माहिती उपलब्ध असणे आणि त्यांचा उपयोग करण्याचे धैर्य असणे, या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. अनेक तरुणींना तक्रार कुठे करावी, कोणाशी संपर्क साधावा किंवा तक्रार केल्यानंतर आपली नोकरी आणि प्रतिष्ठा धोक्यात येईल का, याची चिंता असते. वरिष्ठ व्यक्तीविरुद्ध तक्रार करताना पदसत्तेचा दबाव, सहकाऱ्यांकडून मिळणारा अपुरा पाठिंबा आणि तक्रारीची माहिती इतरांपर्यंत पोहोचण्याची भीती त्यांना गप्प राहण्यास भाग पाडू शकते. काही वेळा अन्याय सहन करण्याचा सल्ला दिला जातो किंवा अनुचित वर्तनाला 'थट्टा' म्हणून दुर्लक्षित केले जाते. तक्रार करणाऱ्या व्यक्तीलाच दोष देण्याऐवजी तिचे म्हणणे निष्पक्षपणे ऐकणे, गोपनीयतेचे नियम पाळणे, न्याय्य चौकशी करणे आणि सूडबुद्धीने कारवाई होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे.

कामाच्या ठिकाणी समानतेचे वातावरण निर्माण करण्यासाठी संस्थांनी केवळ कायद्याचे फलक लावून किंवा समिती स्थापन करून थांबता कामा नये. तक्रार निवारणाची प्रक्रिया कर्मचाऱ्यांना सहज समजेल अशी असावी. नियमित जनजागृती, संवेदनशीलता प्रशिक्षण, पारदर्शक भरती व बढती प्रक्रिया आणि कामगिरीवर आधारित मूल्यमापन यांना प्राधान्य द्यावे. वरिष्ठ अधिकारी आणि व्यवस्थापकांनी आपल्या वर्तनातून आदर्श घालून द्यावा. सुरक्षिततेचा अर्थ केवळ शारीरिक छळापासून संरक्षण एवढाच नाही; तर कर्मचाऱ्यांना निर्भयपणे मत मांडता येणे, कौशल्य विकसित करता येणे, नवीन जबाबदाऱ्या स्वीकारता येणे आणि आपल्या कामाचे योग्य श्रेय मिळणे, हेदेखील तितकेच महत्त्वाचे आहे. मुलींना सुरक्षित आणि सन्मानजनक वातावरण मिळाले, तर त्यांच्या क्षमतेचा उपयोग संस्था आणि समाजाच्या विकासासाठी अधिक प्रभावीपणे होऊ शकतो.

शाळा, महाविद्यालये आणि कुटुंबे यांचीही या परिवर्तनात महत्त्वाची भूमिका आहे. विद्यार्थ्यांना परस्परांचा आदर, लैंगिक समानता, संमती आणि मानवी प्रतिष्ठा यांचे शिक्षण मिळाले पाहिजे. मुलींना आत्मसंरक्षणाचे प्रशिक्षण देणे उपयुक्त असले, तरी संपूर्ण जबाबदारी मुलींच्या खांद्यावर टाकणे योग्य नाही. मुलांनी आणि पुरुषांनीही भेदभावपूर्ण भाषा, अवमानकारक विनोद आणि छळवणुकीला विरोध केला पाहिजे. घरात मुलगा आणि मुलगी यांच्या शिक्षणासाठी समान प्रोत्साहन, घरकामाची न्याय्य विभागणी आणि निर्णयस्वातंत्र्याचा आदर दिसला, तर समानतेचे संस्कार अधिक दृढ होतील. ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल पार्श्वभूमीतील मुलींना शिष्यवृत्ती, कौशल्यविकास, सुरक्षित वाहतूक आणि रोजगाराभिमुख मार्गदर्शन उपलब्ध करून देणेही आवश्यक आहे.

आंतरराष्ट्रीय बालिका दिन हा आपल्या सामाजिक वर्तनाचे आत्मपरीक्षण करण्याची संधी आहे. आपण मुलींना स्वप्ने पाहण्यास प्रोत्साहन देतो; पण ती पूर्ण करण्यासाठी आवश्यक स्वातंत्र्य देतो का? त्यांच्या यशाचे कौतुक करतो; पण निर्णय घेण्याच्या अधिकारात समान भागीदारी देतो का? सुरक्षिततेची भाषा बोलतो; पण कामाच्या ठिकाणी होणाऱ्या अपमानाविरुद्ध ठामपणे उभे राहतो का? या प्रश्नांची उत्तरे आपल्या दैनंदिन वर्तनात शोधावी लागतील. मुलींच्या सुरक्षेसाठी कायदे आवश्यक आहेत; परंतु त्याबरोबर संवेदनशील समाज, जबाबदार संस्था, सजग सहकारी आणि भेदभाव नाकारणारी मानसिकता असणेही तितकेच गरजेचे आहे.

मुलींच्या स्वप्नांना समानतेचे आकाश देणे म्हणजे त्यांच्यासाठी वेगळे आकाश निर्माण करणे नव्हे, तर आधीपासून असलेल्या आकाशात त्यांनाही समान हक्काने उडण्याची संधी देणे होय. मुलगी ही केवळ कोणाची तरी मुलगी, बहीण, पत्नी किंवा आई म्हणून नव्हे, तर स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आणि समान हक्क असलेली नागरिक म्हणून स्वीकारली गेली पाहिजे. तिचे मूल्य तिच्या लिंगावर नव्हे, तर तिच्या ज्ञानावर, कौशल्यावर आणि योगदानावर ठरले पाहिजे. आंतरराष्ट्रीय बालिका दिनाच्या निमित्ताने प्रत्येक घराने, शैक्षणिक संस्थेने, कार्यालयाने आणि समाजाने असा संकल्प करावा की मुलींना केवळ सुरक्षित जग नव्हे, तर सन्मानाने जगता येईल असे वातावरण मिळेल. कारण मुलींच्या स्वप्नांना पंख देणे ही केवळ त्यांची वैयक्तिक गरज नाही; ती समताधिष्ठित, न्याय्य आणि प्रगत समाजाच्या निर्मितीसाठीची अपरिहार्य अट आहे.

■ **सुजाता मोरे, (लेखिका, पर्यटन प्रशासनशास्त्राच्या अभ्यासक आहेत)**

## महाराष्ट्र सर्कलमध्ये 'राष्ट्रीय टपाल सप्ताह २०२६' साजरा

**'जागतिक टपाल दिन' आणि त्यानंतर साजरा होणाऱ्या 'राष्ट्रीय टपाल सप्ताह २०२६' च्या निमित्ताने, महाराष्ट्र सर्कलचे मुख्य पोस्टमास्तर जनरल श्री. रामचंद्र के. जयाभाये यांच्या हस्ते एका पत्रकार परिषदेत 'जागतिक टपाल दिना'चे विशेष 'कॅन्सलेशन' (विशेष टपाल शिक्का) जारी करण्यात आले. श्री. जयाभाये यांनी महाराष्ट्र सर्कलच्या चार प्रमुख व्यावसायिक क्षेत्रांमधील (पार्सेल्स, टपाल सेवा, आंतरराष्ट्रीय संबंध व जागतिक व्यवसाय, आणि टपाल जीवन विमा/ ग्रामीण टपाल जीवन विमा) सुमारे २८% ते ३९% इतक्या वाढीवर प्रकाश टाकला.यावेळी महाराष्ट्र सर्कलची प्रगती, इंडिया पोस्टद्वारे दिल्या जाणाऱ्या विविध सेवा व उत्पादने आणि विभागाने हाती घेतलेले नवीन उपक्रम दर्शवणारे पॉवरपॉइंट सादरीकरणही करण्यात आले. महाराष्ट्र सर्कलचे मुख्य पोस्टमास्तर जनरल श्री. जयाभाये यांनी सोशल मीडिया पोस्टद्वारे कर्मचारी आणि ग्राहकांना शुभेच्छा दिल्या, तसेच सर्व कर्मचाऱ्यांना टपाल सेवा प्रत्येक पात्र ग्राहकापर्यंत पोहोचवण्याचे आवाहन केले. या प्रसंगी त्यांनी महाराष्ट्र आणि गोवा राज्यांमधील टपाल विभागाच्या २०२६-२७ या वर्षात (३०.०९.२०२६ पर्यंत) ८.३७ लाख आधार नोंदणी आणि अद्ययावतीकरण. २०२६-२७ या वर्षात (३०.०९.२०२६ पर्यंत) २.८२ लाख POPSK (पोस्ट ऑफिस पासपोर्ट सेवा केंद्र) अपॉइंटमेंट्सचे कामकाज.१०.२१ कोटी. आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये (३०.०९.२०२६ पर्यंत) बुक आणि वितरित केलेली स्पीड पोस्ट पाकिटे/वस्तूआर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये (३०.०९.२०२६ पर्यंत) बुक आणि वितरित केलेली २६.९० लाख स्पीड पोस्ट पार्सल्स गणपती आणि नवरात्रीनिमित्त आयोजित विशेष रात्रीच्या शिबिरांच्या (नाईट कॅम्प्स) उपक्रमावर प्रकाश टाकण्यात आला.**
**संकलन –संयोजन सुबोध रणशेवरे**

# लोकार्थ

## व्यवस्थापन शिक्षण निर्णायक वळणावर: ७३% बी-स्कूलची एआय-चालित परिवर्तनाची अपेक्षा

कृत्रिम बुद्धिमत्ता, वेगाने होणारे तांत्रिक बदल आणि कामाच्या ठिकाणची बदलती गतिशीलता जागतिक व्यापारात मूलभूत बदल घडवत असताना, जगभरातील बिझनेस स्कूल्स एका अभूतपूर्व वळणावर उभी आहेत. भविष्यासाठी एक सामूहिक मार्ग आखण्यासाठी, BITS पिलानीच्या आश्रयाखाली BITS स्कूल ऑफ मॅनेजमेंटने मुंबईत अखिल भारतीय डीन्स परिषदेचे आयोजन केले.. या प्रमुख संमेलनात जागतिक आणि भारतातील अग्रगण्य संस्थांचे डीन ज्यात बिटसॉमचे डीन प्रा. सरवनन केशवन; युएससी मार्शल स्कूल ऑफ बिझनेसचे डीन प्रा. जेफ्री गॅरेट; कॉर्नेल एससी जॉन्सन कॉलेज ऑफ बिझनेसचे डीन प्रा. विशाल गौर; जॉन्स हॉपकिन्स केरी बिझनेस स्कूलचे असोसिएट डीन प्रा. लॅसे मर्टिन्स; डरहॅम युनिव्हर्सिटी बिझनेस स्कूलचे एक्झिक्युटिव्ह डीन प्रा. कीरन फर्नांडिस; आणि एनटीयू सिंगापूर येथील नानयांग बिझनेस स्कूलचे डीन प्रा. जून यांग यांच्यासह भारतातील ३० हून अधिक बिझनेस स्कूल्सचे नेतृत्वही सहभागी झाले होते.या उच्चस्तरीय विचारविनिमयाच्या निमित्ताने, बिटसॉमने 'ईएफएमडी एक्स बिटसॉम ग्लोबल पर्सपेक्टिव्हज सर्व्हे रिपोर्ट' नावाचा एक सर्वेक्षण अहवाल सादर केला.या अहवालातील सर्वेक्शानुसार एआयची महत्त्वाकांक्षा विरुद्ध अंमलबजावणीतील तफावत: ७३% भारतीय बी-स्कूलच्या प्रमुखांना अपेक्षा आहे की एआयमुळे व्यवस्थापन शिक्षणामध्ये मोठे किंवा मूलभूत परिवर्तन घडून येईल. ९१% प्रतिसादकर्ते पारंपरिक स्वतंत्र विद्यार्थी गतिशीलता कार्यक्रमांपेक्षा (९%) व्यापक, बहुआयामी आंतरराष्ट्रीय भागीदारींना प्राधान्य देतात—ज्यामध्ये संयुक्त संशोधन, प्राध्यापकांची देवाणघेवाण आणि उद्योग-संबंधित उपक्रमांचा समावेश आहे.

## पदुकोण स्कूल ऑफ बॅडमिंटनचा प्रशिक्षक प्रमाणपत्र कार्यक्रम

पदुकोण स्कूल ऑफ बॅडमिंटन आणि इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ स्पोर्ट्स अँड मॅनेजमेंट यांनी भारतातील बॅडमिंटन प्रशिक्षण परिसंस्थेला बळकट करण्याच्या आणि इच्छुक व विद्यमान प्रशिक्षकांसाठी राष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त मार्ग तयार करण्याच्या उद्देशाने, संरचित प्रशिक्षक प्रमाणपत्र कार्यक्रमांची रचना, विकास आणि वितरण करण्यासाठी हातमिळवणी केली आहे. या सहकार्यामुळे पदुकोण स्कूल ऑफ बॅडमिंटनचा तळागाळातील आणि उच्च-स्तरीय बॅडमिंटन प्रशिक्षण व खेळाडू विकासातील अनेक वर्षांचा अनुभव, आयआयएसएमच्या क्रीडा शिक्षण आणि शैक्षणिक कार्यक्रम वितरणातील कौशल्यासोबत एकत्र येईल.हे कार्यक्रम नॅशनल स्किल्स क्वालिफिकेशन फ्रेमवर्क संबंधित स्पोर्ट्स स्किल कौन्सिलच्या आवश्यकता, राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या तरतुदी आणि युनिव्हर्सिटी क्रेडिट फ्रेमवर्क यांच्याशी सुसंगतपणे तयार केले जातील. भारतीय क्रीडा क्षेत्रातील एक महत्त्वाची गरज पूर्ण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे: एक असा संरचित मार्ग तयार करणे, ज्याद्वारे प्रशिक्षणाचे ज्ञान आणि व्यावहारिक अनुभव यांना औपचारिक कौशल्य पात्रता आणि शैक्षणिक मान्यतेची जोड दिली जाईल. एएसके इन्व्हेस्टमेंट मॅनेजर्सकडून सेजवनचे अधिग्रहण; समित वर्तक संयुक्त व्यासपीठाचे

## एअरटेलची मोफत आंतरराष्ट्रीय रोमिंगची सुविधा

भारतातील आघाडीच्या दूरसंचार सेवा पुरवठादारांपैकी एक, भारती एअरटेल यांनी मोफत इंटरनॅशनल रोमिंग लॉन्चची घोषणा केली, ज्यामध्ये अधिक लाभ समाविष्ट आहेत. ८ ऑक्टोबर २०२६ पासून, ग्राहक या इंटरनॅशनल रोमिंग प्लॅनसह दरवर्षी आंतरराष्ट्रीय प्रवासात मोफत रोमिंगचा आनंद घेऊ शकतात. मोफत इंटरनॅशनल रोमिंग ही एअरटेल पोस्टपेड प्लॅनमधील नवीनतम भर आहे, जी फास्ट लेन तंत्रज्ञानाद्वारे उत्कृष्ट अनुभव, अनलिमिटेड डेटा, स्पॅम आणि फसव्या लिंक्सविरुद्ध नेटवर्क-स्तरीय संरक्षण देते. ग्राहक एअरटेल पोस्टपेड अॅडव्हांटेज क्लबद्वारे विविध मनोरंजन सदस्यता आणि एक्सक्लुझिव्ह अनुभवांचा आनंद घेऊ शकतात, ज्यामध्ये कॉमेडी शो, चित्रपट प्रीमियर आणि कॉन्सर्टचा समावेश आहे.८ ऑक्टोबर २०२६ पासून लागू, हे इंटरनॅशनल रोमिंग एअरटेल पोस्टपेड निवडणाऱ्या सर्व ग्राहकांसाठी उपलब्ध आहेत. विद्यमान एअरटेल ग्राहक (जुने पोस्टपेड प्लॅन किंवा प्रीपेडवर असलेले) एअरटेल ॲपद्वारे किंवा जवळच्या एअरटेल स्टोअरला भेट देऊन







दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# केज पोलीस ठाणे हद्दीत तलवारीने केक कापुन दहशत माजवणारे इसम यांचे वर केज पोलीसांची कारवाई तलवार, सुरा व खंजीर जप्त

**केज/ प्रतिनिधी**

गुन्हा घडला तारीख वेळ व ठिकाण दि.09/10/2026 रोजी 16:50 वाजण्याच्या सुमारास मौजे नामेवाडी ता. केज येथे. इन्स्टाग्राम अकाउंट आयडी krishpanchal302 वरुन व गोपनिय सुत्रांकडुन

मार्गदर्शक नवनीत काँवत (भा.पो.से.) पोलीस अधीक्षक, बीड. चेतना तिडके (म.पो.से.) अपर पोलीस अधीक्षक, अंबाजोगाई. वेंकटराम (भा.पो.से.) सहाय्यक पोलीस अधीक्षक, उपविभाग केज.राहुल कामाजी सुर्यतळ, पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे केज.






यांचे मार्गदर्शनाखाली आरोपीस ताब्यात घेणारे पोलीस अधीकारी व अंमलदार सपोनि / श्री. महेश क्षीरसागर, सपोनि/श्री. लक्ष्मण दत्तात्रय उंबरे, ग्रेड पोउपनि / अमीरोद्दीन इनमादार, पोह/1673 बाळासाहेब अंहकारे, मपोह/1571 कविता गायकवाड, पोअ/471 संतोष गिते, पोअ/74 शिवाजी कागदे, पोअ. 1867 नितीन वारे, पोअ/436 राहुल तरकसे, पोअ/2192 दादाराव देवगुडे, सर्व नेमणुक डी. बी. पथक पोलीस ठाणे केज. आरोपीचे नाव व पत्ता 1. अजय अशोक तांदळे वय 26 वर्षे रा. कोरेगाव ता. केज जि. बीड 2. सदाशिव नामदेव आंधळे वय 35 वर्षे रा. नामेवाडी ता. केज जि. बीड

गुन्हयाची थोडक्यात माहिती अशी की, दिनांक 06/10/2026 रोजी केज पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार बाळासाहेब देविदास अहंकारे यांनी 10:00 वा. सुमारास इन्स्टाग्राम अकाउंट आयडी krishpanchal302 वर रील पाहिली कि, इसम नामे अजय अशोक तांदळे व एक अनोळखी इसम यांचा वाढदिवस साजरा करताना दहशत माजवण्याच्या हेतुने तलवारीने केक कापला आहे. व सदरचा व्हिडीओ सोशल मिडीयावर प्रसारीत केला आहे. सदरची माहिती केज पोलीस ठाण्याचे प्रभारी अधीकारी पोनि श्री राहुल सुर्यतळ साहेब यांनी दिल्या नंतर त्यांनी खात्री करुन तात्काळ कायदेशिर कारवाई करण्याचे आदेश दिले, दिनांक 09/10/2026 रोजी गुप्त बातमीदार मार्फत माहिती मिळाली की, दि.06/10/2026 रोजी ज्या तलवारीने केक कापला आहे ती तलवार इसम नामे सदाशिव नामदेव आंधळे रा.नामेवाडी ता. केज जि. बीड याचे राहते घरी ठेवलेली आहे. अशी माहिती मिळाल्यावरुन सदर ठिकाणी पोलीस पथकाने छापा मारुन 1) 40 इंच लांबीची तलवार 2) 10 इंच लांबीचा खंजीर 3) 08 इंच लांबीचा खंजीर, असे शस्त्र जप्त केले असुन सदर आरोपी विरोधात पोलीस ठाणे केज गु.रं.नं. 641/2026 कलम 25,4 शस्त्र अधीनियम सह कलम 135 महाराष्ट्र पोलीस अधीनियम 1951 प्रमाणे कारवाई करण्यात आली असुन सदर गुन्हयात त्यांना अटक करण्यात आली आहे.या पुढे पोलीस ठाणे केज हद्दीत तलवारी केक कापुन दहशत माजवुन वाढदिवस साजरा केल्यास सदर इसमाविरुध्द कायदेशिर कारवाई करण्यात येईल अशी माहिती केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ यांनी दिली.

# शेतकऱ्यांना दुष्काळाच्या संकटातून बाहेर काढा; श्रीरेणुका मातेला साकडे

## घटस्थापनेच्या निमित्ताने सौ. संजीवनीताई कराड यांची प्रार्थना

**लातूर** | अत्यल्प पाऊस झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून पुढील हंगामाची चिंता निर्माण झाली आहे या दुष्काळी परिस्थितीतून शेतकऱ्याला बाहेर काढा अशी प्रार्थना असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या रेणापूर येथील आदिशक्ती श्री रेणुका मातेच्या चरणी भाजपाच्या सौ. संजीवनीताई रमेशआप्पा कराड यांनी घटस्थापनेच्या निमित्ताने केली.

प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी रेणापूर येथील श्री रेणुकादेवी मंदिरात मोठ्या उत्साहाच्या वातावरणात नवरात्र उत्सव साजरा करण्यात येत असून ११ ऑक्टोबर रविवार रोजी दुपारी १ वाजता सौ. संजीवनीताई रमेशआप्पा कराड यांच्या उपस्थितीत मंदिरात घटस्थापना करण्यात आली. याप्रसंगी उपजिल्हाधिकारी अविनाश कोरडे, रेणापूरचे तहसीलदार प्रशांत थोरात, संदीप पाटील, औसा तहसीलदार घनश्याम अडसूळ, पोलीस निरीक्षक देडे देवस्थानचे सहअध्यक्ष राम पाटील यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

मोठ्या उत्साहाच्या भक्तिमय वातावरणात श्रीकांत धर्माधिकारी यांच्या मंत्रोपचाराने विविध वाजंत्रीच्या गजरात विधीवत घटस्थापना करण्यात आली. याप्रसंगी रेणापूर येथील तरुणांनी तुळजापूरहून आणलेल्या ज्योती चे स्वागत करण्यात आले. रेणुका देवी मंदिर ट्रस्टच्या वतीने सौ. संजीवनीताई रमेशआप्पा कराड यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.





निसर्गाच्या लहरीपणामुळे आणि पावसाच्या अनिश्चिततेमुळे दुष्काळाच्या संकटात सापडलेल्या शेतकऱ्याला दिलासा मिळावा, संकट दूर होऊन नवी संजीवनी मिळावी अशी प्रार्थना याप्रसंगी रेणुका मातेकडे सौ. संजीवनीताई रमेशआप्पा कराड यांनी केली. यावेळी मंदिर ट्रस्टचे रमाकांत वाघमारे, तुकाराम कोल्हे, विठ्ठल कटके, रावसाहेब राठोड, मनोहर व्यवहारे, प्रशांत आकनगिरे, गुरुशिद उटगे, पंडित माने, शहाजी कातळे, सुर्यकांत आकनगिरे, नगरपंचायतीचे सभापती दत्ता सरवदे, धरती महेश गाडे, भाजपाचे शहराध्यक्ष अच्युत कातळे, मारूफ अत्तार, राजकुमार आलापुरे, उमेश सोमाणी, सचिन मोटेगावकर, विक्रांत पाटील, पदम पाटील, पुंडलिक ईगे, महेश गाडे, संतोष राठोड, नर्सिंग यलगटे, अंकुश मोटेगावकर, सुधिराप्पा तोडकरी, दत्ता गोंधळी, व्यंकटेश कुलकर्णी, नरसिंग पांचाळ यांच्यासह अधिकारी, कर्मचारी, शहरातील सर्व प्रतिष्ठित नागरिक, मंदिराचे सर्व पुजारी सेवेकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ज्ञानदा ठोंबरेने कुस्तीत मिळवले कांस्यपदक; देऊळगाव घाटच्या शिरपेचात मानाचा तुरा

## बापाच्या कष्टाचं लेकीने केलं चीज; पदक मिळताच वडिलांच्या डोळ्यांत आनंदाश्रू

**देऊळगाव (आदिनाथ ठोंबरे)**

जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर यशाचं शिखर गाठता येतं, हे देऊळगाव घाट येथील ज्ञानदा ठोंबरे हिने सिद्ध करून दाखवलं आहे. राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत ४२ किलो वजन गटात कांस्यपदक पटकावत ज्ञानदाने देऊळगाव घाटच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. तिच्या या यशामुळे संपूर्ण गावातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

ज्ञानदा ही ज्ञानेश्वर विद्यालय येथे शिक्षण घेत असून, शिक्षणासोबतच कुस्तीच्या मैदानातही ती आपल्या कर्तृत्वाची छाप पाडत आहे. श्रीगोंदा येथील फड यांच्या तालमीत ती कुस्तीचे धडे गिरवत आहे. नियमित सराव, कठोर मेहनत, प्रशिक्षकांचे मार्गदर्शन आणि जिंकण्याची जिद्द यांच्या बळावर तिने राज्यस्तरीय स्पर्धेत कांस्यपदक मिळवण्याची उल्लेखनीय कामगिरी केली.

ज्ञानदाच्या या यशामागे तिच्या वडिलांचे कष्ट, त्याग आणि लेकीच्या स्वप्नांवर असलेला अढळ विश्वास आहे. तिचे वडील हरिकृष्ण ठोंबरे हे अहिल्यानगर महानगरपालिकेत कार्यरत आहेत. आपल्या कामाच्या जबाबदाऱ्या सांभाळत त्यांनी लेकीच्या स्वप्नांना बळ देत तिला पुढे जाण्यासाठी प्रोत्साहन दिले. लेकीने कुस्तीच्या मैदानात मिळवलेले यश पाहून त्यांच्या कष्टांचे चीज झाले. ज्ञानदाच्या गळ्यात पदक पडताच वडिलांच्या डोळ्यांतून आनंदाश्रू ओघळले. ते अश्रू केवळ आनंदाचे नव्हते, तर लेकीच्या मेहनतीचा अभिमान, तिच्यासाठी घेतलेल्या कष्टांचे सार्थक आणि उज्ज्वल भविष्याच्या स्वप्नांचे प्रतीक होते.



एका बापाच्या कष्टाला लेकीच्या यशाची मिळालेली ही पावती प्रत्येकाच्या मनाला भावणारी आहे. कुस्तीच्या मैदानात प्रतिस्पर्ध्याला ताकदीने आणि जिद्दीने सामोरे जाणारी ज्ञानदा आज अनेक मुलींसाठी प्रेरणादायी ठरत आहे. तिच्या या यशाने ग्रामीण भागातील मुलींमध्येही क्रीडा क्षेत्रात मोठी कामगिरी करण्याची क्षमता आहे, हे पुन्हा एकदा अधोरेखित केले आहे.ज्ञानदाच्या या यशामुळे देऊळगाव घाट गावाची मान उंचावली असून, तिच्या पुढील वाटचालीसाठी सर्व स्तरांतून शुभेच्छा दिल्या जात आहेत. भविष्यातही तिने कुस्तीच्या मैदानात अशीच चमकदार कामगिरी करत उच्चस्तरीय स्पर्धांमध्ये यश मिळवावे आणि आपल्या गावासह जिल्ह्याचे व राज्याचे नाव उज्ज्वल करावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

ज्ञानदाच्या जिद्दीला सलाम! तिच्या यशामागे उभ्या असलेल्या हरिकृष्ण ठोंबरे यांच्या कष्टांनाही मानाचा मुजरा!लेकीच्या गळ्यातील कांस्यपदक हे केवळ तिच्या मेहनतीचे नव्हे, तर बापाच्या घामा चेही अनमोल फळ आहे.

- **ज्ञानदा ने आज जे काही 42 किलो वजणी गटात कुस्तीमध्ये कांस्यपदक पटकाविले त्यामुळे माझ्या कष्टाचे चीज झाले. - वडील. हरिकृष्ण ठोंबरे.**

## संभाजीनगर पोलिसांची धडक कारवाई

# १८० किलो गोवंश सदृश कातडीसह ५४ हजारांचा मुद्देमाल जप्त

**परळी :** येथील संभाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध गोवंश कातडी बाळगणाऱ्या एकावर पोलिसांकडून कठोर कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. पोलिसांनी इरशाद नगर भागातील एका पत्राच्या शेडमध्ये छापा टाकत सुमारे ५४,००० रुपये किमतीची गोवंश सदृश जनावरांची कातडी जप्त केली आहे.

पोलिसांनी चार पांढऱ्या पोत्यांमध्ये भरलेली अंदाजे १८० किलो वजनाची गोवंश सदृश जनावराची कातडी हस्तगत केली. प्रति किलो ३०० रुपये प्रमाणे एकूण ५४,००० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.




यामध्ये आरोपी कुरैशी अब्दुल गनी अब्दुल वहाब (वय २१ वर्षे), रा. आझाद नगर, परळी वै, स्वतःच्या ताब्यातील पत्राच्या शेडमध्ये विनापरवाना व बेकायदेशीररीत्या गोमांस सदृश कातडी बाळगल्यामुळे त्याच्याविरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ च्या कलम ५(ब), ५(क), ९(अ) अन्वये गुन्हा (२४५/२०२६) दाखल करण्यात आला आहे.

सहाय्यक पोलीस निरीक्षक यांच्या आदेशानुसार पुढील तपासाची जबाबदारी सहाय्यक फौजदार चव्हाण यांच्याकडे सोपवण्यात आली आहे.

# सफा शेखची नागपूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेसाठी निवड

## जिल्हा व विभागीय स्तरावर चमकदार कामगिरी





**प्रतिनिधी : सोपान पगारे**

आष्टी तालुक्यातील साबलखेड येथील सर्वसामान्य कुटुंबातील सफा शेरअली शेख या विद्यार्थिनीने रायफल शूटिंग या क्रीडा प्रकारात उल्लेखनीय कामगिरी करत राज्यस्तरीय स्पर्धेत धडक मारली आहे. वयाच्या अवघ्या १४ व्या वर्षी जिल्हा व विभागीय स्तरावर आपल्या कौशल्याची छाप पाडत तिने राज्यस्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे. तिच्या या यशामुळे साबलखेडसह आष्टी तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

जिल्हा क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य आणि अजिंठा रायफल शूटिंग क्लब, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती संभाजीनगर येथे जिल्हास्तरीय व विभागीयस्तरीय रायफल शूटिंग स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत सफा शेख हिने आपल्या नेमबाजी कौशल्याचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. अचूक नेम साधण्याची क्षमता, एकाग्रता आणि सातत्यपूर्ण सरावाच्या जोरावर तिने दोन्ही स्तरांवर आपली गुणवत्ता सिद्ध केली. या कामगिरीच्या बळावर तिची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

सफा शेख ही कडा येथील महावीर मेहेर इंग्लिश स्कूलमध्ये इयत्ता सातवीत शिक्षण घेत आहे. अभ्यासाबरोबरच क्रीडा क्षेत्रातही तिने आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. रायफल शूटिंगसारख्या कौशल्य, एकाग्रता आणि संयमाची आवश्यकता असलेल्या खेळात तिने मिळवलेले यश विशेष कौतुकास्पद मानले जात आहे. तिला टीम टॉपर रायफल शूटिंग क्लबचे प्रशिक्षक अहमद पठाण सर यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

### ■ नागपूर येथे राज्यस्तरीय स्पर्धेचे आव्हान

सफा शेख हिची निवड दिनांक २२ व २३ ऑक्टोबर २०२६ रोजी नागपूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेसाठी झाली आहे. या स्पर्धेतही उत्कृष्ट कामगिरी करून यशाची परंपरा कायम ठेवण्याचा तिचा प्रयत्न राहणार आहे. जिल्हा व विभागीय स्तरावरील यशानंतर आता राज्यस्तरावर आपल्या नेमबाजी कौशल्याची चुणूक दाखविण्याची संधी तिला मिळाली आहे.

### ■ आई-वडिलांच्या प्रोत्साहनातून यशाला बळ

सर्वसामान्य कुटुंबातून पुढे येत सफा शेख हिने मिळवलेले यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. तिची आई अंजुम शेख आणि वडील शेरअली शेख हे तिला सातत्याने प्रोत्साहन देत असून तिच्या क्रीडा प्रवासात मोलाची साथ देत आहेत. पालकांचे प्रोत्साहन, प्रशिक्षकांचे मार्गदर्शन आणि स्वतःच्या मेहनतीच्या जोरावर सफाने राज्यस्तरीय स्पर्धेपर्यंत मजल मारली आहे.

### ■ मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव

सफा शेख हिची राज्यस्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल आमदार सुरेश धस, माजी आमदार भीमराव धोंडे, बाळासाहेब आजबे, ज्येष्ठ पत्रकार प्रा. निसार शेख, युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, पत्रकार जावेद पठाण, तेजवार्ता न्यूज नेटवर्कचे संपादक सय्यद बबलू, जनता उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य सय्यद अयुब सर यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी तिचे अभिनंदन केले आहे. तसेच नागपूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी तिला शुभेच्छा दिल्या आहेत. सफा शेख हिने मिळवलेले यश हे तिच्या मेहनतीचे, जिद्दीचे आणि योग्य मार्गदर्शनाचे फलित असून, राज्यस्तरीय स्पर्धेतही ती उत्तम कामगिरी करेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
बीड, सोमवार, 12 ऑक्टोबर 2026

## सावरगाव घाट येथे २० ऑक्टोबर रोजी भव्य दसरा मेळावा

# लाखोंच्या संख्येने उपस्थित राहण्याचे ‘लोकनेते वारसा प्रतिष्ठान’चे आवाहन

**बीड / पाटोदा:**

संत भगवान बाबांचे जन्मगाव असलेल्या सावरगाव घाट (भगवान भक्तीगड) येथील यंदाचा भव्य दसरा मेळावा आगामी २० ऑक्टोबर रोजी मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडणार आहे. संत भगवान बाबांपासून सुरू झालेली आणि लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांनी जोपासलेली ही ऐतिहासिक परंपरा यंदाही नेत्या पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्त्वाखाली अत्यंत दिमाखात पार पडणार आहे. या महामेळाव्याला राज्यभरातून लाखोंच्या संख्येने समाजबांधवांनी उपस्थित राहावे, असे आवाहन ‘लोकनेते वारसा प्रतिष्ठान’च्या वतीने करण्यात आले आहे.





■ **परंपरेची अखंड साखळी आणि दिग्गजांची उपस्थिती**

लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांनी सुरू केलेल्या या दसरा मेळाव्याच्या परंपरेने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व सामाजिक जीवनात एक वेगळे स्थान निर्माण केले आहे. यंदाही हाच आदर्श डोळ्यांसमोर ठेवून हा सोहळा संपन्न होत आहे. या मेळाव्यात राज्याचे नेते, माजी मंत्री धनंजयजी मुंडे, माजी खासदार डॉ. प्रीतमताई मुंडे यांच्यासह विविध पक्षांचे आमदार, खासदार आणि राज्यातील नामवंत मान्यवर नेते उपस्थित राहणार आहेत. गोपीनाथराव मुंडे आणि पंकजाताई मुंडे यांना मानणारा अठरापगड समाज, वारकरी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने या सोहळ्यात सहभागी होणार आहेत.

■ **"वर्षभर कुठेही राहा, पण दसरा मेळाव्याला सावरगावला दिसा"**

संत भगवान बाबांच्या जन्मभूमीत होणाऱ्या या महामेळाव्यासाठी मुंडे भक्त आणि समाजबांधवांमध्ये प्रचंड उत्साह पाहायला मिळत आहे. "वर्षभर कुठेही राहा, पण दसऱ्याला सावरगावला दिसा," अशी आर्त साद घालत ‘लोकनेते वारसा प्रतिष्ठान’चे परशुराम कुटे, वैभव आंधळे, अनिकेत नागरे यांच्यासह सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी राज्यातील तमाम जनतेला या ऐतिहासिक मेळाव्याला आवर्जून उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

■ **"गड ऊर्जेचा, गड आशेचा... चला सावरगाव घाट!"**

"आम्ही येतोय, तुम्हीही चला... आपला दसरा, आपली परंपरा, गड ऊर्जेचा गड आशेचा - चला सावरगाव घाट!" असा प्रेरक नारा देत यंदाचा दसरा मेळावा विक्रमी गर्दीने ऐतिहासिक ठरवावा, असे निवेदन संघटनेतर्फे प्रसिद्धीस देण्यात आले आहे.

---

## पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंह राजे भोसले यांच्याकडून आ. रमेशअप्पा कराड यांच्या प्रकृतीची विचारपूस



**लातूर |** लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाचे आ. रमेशअप्पा कराड यांच्यावर नुकतीच अँजिओप्लास्टीची शस्त्रक्रिया करण्यात आली. ही माहिती समजताच लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंह राजे भोसले यांनी प्रयाग या त्यांच्या निवासस्थानी भेट देऊन प्रकृतीची आस्थेवाईकपणे विचारपूस केली.

आपल्या प्रकृतीची योग्य काळजी घेण्याचा सल्ला देऊन आ. रमेशअप्पा कराड यांना आपण लवकरात लवकर पूर्णपणे बरे होवून पुन्हा नव्या उत्साहाने जनसेवेसाठी कार्यरत व्हावे, आशा सदिच्छा पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंह राजे भोसले यांनी दिल्या. यावेळी लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघासह जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त परिस्थिती आणि पिकविमा, विकासकामे, जनहिताचे प्रश्न या अनुषंगाने चर्चा झाली. याप्रसंगी भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड, भाजपाचे विक्रमकाका शिंदे, महेंद्र गोडभरले, सुरज शिंदे, प्रताप पाटील, शरद दरेकर, उद्धव काळे, राजकिरण साठे पत्रकार रामेश्वर बद्दर यांच्यासह अनेक जण होते.

## श्री संत भगवानबाबा दुर्गोत्सवाची पारंपरिक पध्दतीने स्थापना

### दुष्काळी स्थितीमुळे उत्सवी कार्यक्रम स्थगित;समाजप्रबोधनावर भर-फुलचंद कराड





**परळी वैजनाथ :** परळी शहर व परिसरातील दुर्गा भक्तांचे आकर्षण असलेल्या श्री संत भगवानबाबा सार्वजनिक दुर्गोत्सव व नवरात्रोत्सवास पारंपरिक पध्दतीने भगवानबाबा प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा भगवान सेनेचे सरसेनापती फुलचंद कराड यांचे जावई प्रदिपराव व मुलगी मोनाली आंधळे या दाम्पत्याच्या हस्ते देविची घटस्थापना करण्यात आली. यावेळी शिवसेना तालुका समन्वयक माऊली फड धर्मापुरीकर व्यापारी बंडु गरुड , बियाणी शेठ रवी कराड , प्रदीप कराड नारायण फड , बळीराम मुंडे नारायण श्रीमंत ढाकणे परळी व परिसरातील दुष्काळी स्थितीमुळे दुर्गा महोत्सवातील उत्साही व मनोरंजनाचे कार्यक्रम स्थगित करुन संस्कृती जोपासणाऱ्या कार्यक्रमांचे आयोजन करत साजरा करण्यात येत असल्याचे फुलचंदराव कराड यांनी सांगितले.

श्री संत भगवानबाबा सार्वजनिक दुर्गोत्सव हा गत १७ वर्षापासुन परळीकरांच्या जिव्हाळ्याचा आणि श्रध्देचा उत्सव आहे.यंदा हा उत्सव साधेपणाने परंतु भक्तिभाव आणि परंपरा जपत साजरा करण्यात येत आहे.दुष्काळी परिस्थितीची जाणीव ठेवून यंदाच्या उत्सवामधील मनोरंजनात्मक कार्यक्रम स्थगित करुन किर्तन,रावण दहन असे पारंपरिक कार्यक्रम होणार आहेत.श्री संत भगवानबाबा सार्वजनिक दुर्गोत्सवाच्या देवीची स्थापना दि.११ ऑक्टोबर रोजी मोंढा मार्केट येथे उभारण्यात आलेल्या आकर्षक मंडपात सौ.मोनाली व प्रदिपराव आंधळे यांच्या हस्ते घटस्थापना व विधीवत पुजा करुन करण्यात आली. दुर्गोत्सव मंडळाचे पदाधिकारी व सदस्य, स्वयंसेवक, प्रतिष्ठित नागरिक आणि स्थानिक युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# जमात-ए-इस्लामी हिंदतर्फे परळीत 'सायन्स ऑलिम्पियाड'चे यशस्वी आयोजन; उर्दू माध्यमाचे तब्बल ४०० विद्यार्थी सहभागी

## विज्ञान विश्वात परळीच्या विद्यार्थ्यांचा डंका; CIO तर्फे भव्य सायन्स ऑलिम्पियाड संपन्न

**परळी वैजनाथ:** जमात-ए-इस्लामी हिंद अंतर्गत कार्यरत असलेल्या CIO (चिल्ड्रन्स इस्लामिक ऑर्गनायझेशन ऑफ इंडिया) या संस्थेच्या वतीने देशभरात सायन्स ऑलिम्पियाड परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. याच मोहिमेचा एक भाग म्हणून आज जमात-ए-इस्लामी हिंद, परळी स्थानिक शाखेच्या वतीने परळीत या भव्य परीक्षेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या परीक्षेसाठी इमदादुल उलूम स्कूल (पावर हाऊस बिल्डिंग) येथे मुख्य केंद्र ठेवण्यात आले होते, जिथे शहरातील विविध शाळांमधील सुमारे ४०० विद्यार्थी-विद्यार्थिनींनी अत्यंत उत्साहाने सहभाग घेतला.

या सायन्स ऑलिम्पियाडमध्ये डॉ. झाकीर हुसेन स्कूल, मिलिया स्कूल, इमदादुल स्कूल, अंजुमन स्कूल, अल हुदा स्कूल, आयडियल स्कूल आणि बिलाल स्कूल या नामांकित शाळांमधील विद्यार्थ्यांनी आपली वैज्ञानिक प्रतिभा दाखवून दिली.








■ **मान्यवरांची उपस्थिती आणि कौतुक:**

या भव्य परीक्षेच्या आयोजनाची पाहणी करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवण्यासाठी शहरातील अनेक प्रमुख आणि प्रतिष्ठित व्यक्तिमत्त्वांनी परीक्षा केंद्राला भेट दिली. यामध्ये प्रामुख्याने जामियातुल बनातचे संस्थापक मौलाना तैमूर मिल्ली साहेब महेबुबिया एज्युकेशन सोसायटीचे सचिव सय्यद हनिफ उर्फ बहादूर भाई, नर्सिंग कॉलेजचे संचालक मजहर खतीब साहेब,सहारा एडुकेशनल अँड वेलफेर सोसायटी व न्यू सहारा इंग्लिश स्कूल चे अध्यक्ष मोईन फारुकी, सायन्सचे ज्येष्ठ शिक्षक एजाज जागीरदार सर, मौलाना रईस साहेब, मौलाना बुरहान साहेब, परळीचे प्रसिद्ध व्यावसायिक अकबर कच्ची, काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते सय्यद साजेद बबलू AIMIM चे नगरसेवक शेख मोहसीन सामाजिक कार्यकर्ते शेख सद्दाम आणि इतर अनेक मान्यवरांचा समावेश होता. सर्व पाहुण्यांनी परीक्षा पद्धतीचे बारकाईने निरीक्षण केले आणि या अनोख्या उपक्रमाचे व विद्यार्थ्यांच्या प्रतिभेचे भरभरून कौतुक केले.

■ **मुख्य उद्दिष्ट: स्पर्धा परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना सक्षम करणे**

या परीक्षेचा मुख्य उद्देश उर्दू माध्यमाच्या विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची (Science) आवड निर्माण करणे आणि त्यांची वैचारिक समज अधिक मजबूत करणे हा आहे. आयोजकांनी सांगितले की, या उपक्रमाचा हेतू उर्दू माध्यमाच्या मुलांना भविष्यात NEET, JEE, MPSC आणि UPSC सारख्या कठीण स्पर्धा परीक्षांसाठी तयार करणे आहे. जेणेकरून जेव्हा बदलत्या आणि नव्या भारताचे चित्र समोर येईल, तेव्हा हे विद्यार्थी विज्ञानाच्या क्षेत्रात आपले मोलाचे योगदान देऊन देशाच्या प्रगतीचा मुख्य भाग बनू शकतील.

■ **संयुक्त प्रयत्नांमुळे मिळाले यश**

हा भव्य कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जमात-ए-इस्लामी हिंद, परळीच्या कार्यकर्त्यांसह SIO (स्टूडेंट्स इस्लामिक ऑर्गनायझेशन) आणि GIO (गर्ल्स इस्लामिक ऑर्गनायझेशन) च्या सदस्यांनी जमिनी स्तरावर महत्त्वाची भूमिका बजावली. परीक्षा सुरळीतपणे पार पाडण्यासाठी सर्व सहभागी शाळांच्या मुख्याध्यापकांनी आणि शिक्षक वर्गाने (Teachers) केलेल्या मोलाच्या सहकार्याबद्दल आयोजकांनी सर्वांचे मनापासून आभार मानले आहेत.